घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल
शुध्द तूप
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
फोन नं.(०२५६२) २३८६६१ navalgheedhule@gmail.com सर्वत्र उपलब्ध

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.५ ■ मंगळवार ६ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26

डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार दि.५ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.
संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

## एमपीएससीच्या अध्यक्षांसह सदस्यांची चौकशी फडणवीसांची राज्यपालांकडे अहवाल मागणी

**मुंबई, दि. ५ : महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीच्या विद्यमान अध्यक्ष, माजी अध्यक्ष तसेच सदस्यांविरोधात संविधानाच्या कलम ३१७ नुसार कारवाई करण्याचा मार्ग आता मोकळा होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्याकडे विशेष समिती गठीत करण्याची शिफारस केली आहे. या समितीच्या माध्यमातून आयोगाच्या कारभाराची चौकशी करून पुढील कारवाईचा निर्णय घेण्याची शक्यता आहे. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात यावी आणि समितीने तीन महिन्यांच्या आत अहवाल**



**सादर करावा, अशी मागणी मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांकडे केली आहे. दरम्यान, एमपीएससी सचिव महेंद्र हरपाळकर यांना पदावरून कार्यमुक्त करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.**

राज्यपालांनी नेमलेल्या समितीच्या अहवालातील निष्कर्षांच्या आधारे एमपीएससीच्या संबंधित अध्यक्ष आणि सदस्यांविरोधात पुढील कठोर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका सरकारने घेतल्याचे समोर आले आहे. गेल्या काही दिवसांपासून एमपीएससीच्या विविध परीक्षांच्या आयोजनावरून सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. परीक्षा प्रक्रियेतील कथित अनियमितता, नियोजनातील गोंधळ आणि इतर बाबींमुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. एमपीएससीचे अध्यक्ष हे घटनात्मक पद असल्याने राज्य सरकारला त्यांना थेट पदमुक्त करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे संविधानाच्या कलम ३१७ नुसार अध्यक्षांच्या कार्यपद्धतीची न्यायालयीन चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन देत विविध निर्णयांची घोषणा केल्यानंतर विद्यार्थी शिष्टमंडळाने आपले बेमुदत आंदोलन तूर्त स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एमपीएससीच्या परीक्षा, पदभरती आणि आयोगाच्या कारभारासंदर्भातील वादावर सरकारने घेतलेल्या निर्णयांकडे आता विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. (पान ४ वर)

### निवडणुक आयोगास नोटीस
## फॉर्म सहा बदलास मान्यता नाहीच- सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली, दि. ५ : विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेदरम्यान वापरण्यात येणाऱ्या फॉर्म सहा मधील बदलास सर्वोच्च न्यायालयाने कोणतीही मंजुरी दिली नसल्याचे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले आहे. सुधारित फॉर्मला सुप्रीम कोर्टाची मान्यता असल्याचा निवडणूक आयोगाचा दावा सोमवारी झालेल्या सुनावणी दरम्यान फेटाळण्यात आला. निवडणूक आयोगाने गेल्या आठवड्यात काही राज्यांमध्ये सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेसाठी ऑनलाइन फॉर्म सहा सोबत जोडण्यात आलेल्या नव्या घोषणापत्राला सर्वोच्च न्यायालयाची मान्यता असल्याचा दावा केला होता. मात्र, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात कारवाईची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी (पान ४ वर)

### अमृतमहोत्सव निमित्त शेतकऱ्यांना गोदान
## ओमप्रकाश अग्रवाल म्हणजे अनेक क्षेत्रांतील यशस्वी भीष्म पितामह-महसूलमंत्री बावनकुळे

**धुळे, दि.५- ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवातही अग्रवाल कुटुंबाने दुष्काळी स्थितीचे समाजभान राखत शेतकऱ्यांप्रती आपली संवेदनशीलता दाखवून दिली. अकरा शेतकऱ्यांना वासरांसह दुभत्या गायींचे दान करतानाच त्यांनी शासनाच्या दुष्काळ निधीसाठी अकरा लाखांचा धनादेश देण्याचे जाहीर केले. ओपीजी हे शहराच्या सामाजिक, राजकीय, सहकार, आध्यात्मिक, उद्योग क्षेत्रातले भीष्म पितामह आहेत. त्यांचा जीवनप्रवास संघर्षशील राहिला. राष्ट्रवादाची प्रेरणा घेत त्यांची जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून सुरू झालेली वाटचाल भारतीय जनता युवा मोर्चा आणि भाजपमधील**



**विविध जबाबदाऱ्यांनी युक्त आहे. समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले, असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.**

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा ज्येष्ठ उद्योजक ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त रविवारी (ता.४) येथील खान्देश गोशाळेच्या मैदानावर ओपी शेट यांचा सन्मान, भजनसंध्या, भक्तिमय गीतगायन, शेतकऱ्यांना गोदानाचा कार्यक्रम झाला, त्यावेळी अध्यक्षस्थानावरून श्री. बावनकुळे बोलत होते. यावेळी केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, (पान ४ वर)

## आदि. शेतकऱ्यांचे वनदावे तातडीने निकाली काढा ना.बावनकुळेंना आ.पटेल व आ.पावरांचे साकडे



**शिरपूर, दि.५- शिरपूर तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांचे प्रलंबित वनदावे दि. १० सप्टेंबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार तातडीने निकाली काढून त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी धुळे व नंदुरबार जिल्हा विधान परिषद सदस्य आमदार अमरिशभाई पटेल व शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम पावरा यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. याबाबत महसूलमंत्र्यांनी विभागीय आयुक्तांना त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश लगेच दिले आहेत.**

याबाबत आमदार अमरिशभाई पटेल व आमदार काशिराम पावरा यांनी दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना लेखी निवेदन दिले आहे. शिरपूर विधानसभा मतदारसंघात म्हणजेच शिरपूर तालुक्यात सुमारे ७८०० ते ८००० प्रलंबित वनदावे असून, जोडपत्र (२) न मिळाल्याने अनेक दावेदारांना अनुसूची जे प्राप्त झालेली नाही. तसेच ग्रीस्टॅग नंबर (शेतकरी ओळख क्रमांक) प्राप्त न झाल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना शासनाच्या विविध सवलती व योजनांचा लाभ मिळत नसल्याचे आमदार अमरिशभाई पटेल व आमदार काशिराम पावरा यांनी निदर्शनास (पान ४ वर)

## बसमधून पावणे सहा लाखांचा खवा जप्त

धुळे, दि.५- अहमदाबादहून (गुजरात) छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या लक्झरी बसची शहरातील साक्री रोडवर अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे तपासणी केली. एक हजार ८५४ किलो मावा तपासणीसाठी जप्त केला. त्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले. सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने धुळ्यात कारवाई केली.

अहमदाबादहून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जाणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स (एआर०१/क्यू ४२४२) आज पहाटे पाचच्या सुमारास साक्री रोड विद्यावर्धिनी महाविद्यालयासमोर(पान ४ वर)

## धनगर समाजाची फसवणुक करणाऱ्या केंद्र व राज्य शासनाविरोधात पंधरा ऑक्टोबरला मोर्चा

**सोनगीर दि.५ (प्रतिनिधी) विद्यमान केंद्र व राज्य शासनाच्या प्रमुखांनी धनगर समाजाची घोर फसवणूक केली असून या फसव्या, लबाड राजकारण्यांना जाग आणण्यासाठी राज्यभरातील धनगर समाजाने रस्त्यावर उतरावे असे आवाहन धनगर समाज अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचे नेते दीपक बोराडे यांनी येथे समाजाला संबोधित करताना केले.दरम्यान, येत्या १५ ऑक्टोबरला धुळे शहरात धनगर समाजाचा भव्य आरक्षण मोर्चा व मेळावा आयोजित करण्यात आला आहे.या मेळाव्याच्या जनजागृतीसाठी श्री बोराडे हे कार्यकर्त्यांसह धुळे जिल्ह्याचा दौरा करत आहेत.**

या दौऱ्या दरम्यान त्यांनी रविवार,दि. चार रोजी येथील धनगर समाज बांधवांची भेट घेऊन त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी तरुण कार्यकर्त्यांनी त्यांचे ढोल ताशाच्या गजरात जंगी स्वागत केले. त्यांच्यासोबत मेंढपाळ धनगर समाजाचे तरुण नेतृत्व व उद्योजक लखन रुपनर हे होते.यावेळी श्री बोराडे समाज बांधवांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतर देशात व महाराष्ट्रात रानोमाळी हिंडणाऱ्या भटक्या धनगर समाजाची सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. तिच्यात आजही फारसा फरक पडलेला नाही. यामुळे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण दिले.परंतु धनगर ऐवजी धनगड असा शब्दप्रयोग आल्याने आजपर्यंत या आरक्षणाचा लाभ समाजाला मिळू शकलेला नाही.आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून समाज केंद्र व राज्य शासनाची झगडत आहे पण केवळ खोट्या आश्वासनाशिवाय समाजाला (पान ४ वर)

## सालटेकजवळ दुचाकी अपघात; एक जण ठार

धुळे, दि.३- सालटेक (ता. साक्री) गावाजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या दोन दुचाकींची समोरा समोर जोरदार धडक झाली. त्यात गंभीर जखमी होऊन प्रौढाचा मृत्यू झाला. अनिल दगाजी सोनवणे (वय ५०, रा. जुनीबाडी, पेरेजपूर, ता. साक्री) असे त्यांचे नाव आहे.

शुक्रवारी दोन ऑक्टोबरला दुपारी साडेतीनच्या सुमारास सालटेक गावशिवारात अपघात झाला. अनिल सोनवणे त्यांच्या दुचाकीने एमएच १८/व्हीटी-५१४३ जात होते. त्यावेळी समोरून भरधाव येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीने (एमएच१८/बीवाय१५२५) जोरदार धडक दिली. या धडकेत अनिल सोनवणे (पान ४ वर)




## पालिका पाणीपुरवठा योजना चांगल्या दर्जाची करणार- आ.चंद्रकांत रघुवंशी

**नवापूर, दि.५(प्रतिनिधी)- नवापूर तालुक्यात शिवसेना शिंदे गटाला मोठे बळ मिळाले असून, तालुक्यातील तब्बल २७ गावांतील शेकडो कार्यकर्त्यांनी शनिवारी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. येथे शिवसेना शिंदे गटाच्या कार्यालयाच्या उद्घाटनानिमित्त आयोजित प्रवेश सोहळ्यात हा पक्षप्रवेश झाला. पालिकेची पाणीपुरवठा योजना अत्यंत** (पान २ वर)

## जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष भूपेश पटेल सल्लागार राजवर्धन कदमबांडेंच्या हस्ते बक्षीस वाटप

**शिरपूर/धुळे, दि.५- धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व सल्लागार माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक बक्षीस वितरण समारंभ व सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.**

यावेळी कार्यक्रमाला धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, सल्लागार माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, मूळच्या धुळे येथील बीसीसीआय स्कोअरर केतकी




नाईक-जामगांवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

धुळे येथील एस.व्ही. के.एम. संस्थेच्या इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या ऑडिटोरियम हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमास धुळे शहर व तालुका, साक्री, शिंदखेडा, शिरपूर आणि दोंडाईचा येथील खेळाडू, पालक, प्रशिक्षक तसेच क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (पान २ वर)



## सुशिनाल्याच्या पुनर्वनासाठी मान्यता द्या ना.बावनकुळेंना खा.बच्छावांचे निवेदन

**धुळे, दि.५- धुळे शहरातील सुशी नाला परिसरातील अतिक्रमण कारवाईमुळे बेघर झालेल्या कुटुंबांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी धुळे लोकसभेच्या खासदार डॉ. शोभा दिनेश बच्छाव यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांनी निवेदन सादर केले. यावेळी धुळे जिल्हाधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते उपस्थित होत्या.**

सुशीनाला परिसरातील बाधित बेघर कुटुंबांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी देवपूर येथील महसूल विभागाच्या मालकीची मौजे देवपूर, सर्व्हे क्रमांक ११३, मधील ३ एकर जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची मान्यता मिळावी, अशी मागणी खासदार डॉ. बच्छाव यांनी निवेदनाद्वारे केली. खासदारांनी सादर केलेल्या निवेदनाची तातडीने दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्याच ठिकाणी उपस्थित जिल्हाधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते यांना सदर तीन एकर शासकीय जमीन बेघर कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी उपलब्ध करून देण्यास शासनाची मान्यता मिळण्याकरिता आवश्यक प्रस्ताव तातडीने (पान ४ वर)

### ओमप्रकाश अग्रवाल यांचा अमृतमहोत्सव
## हंसराज रघुवंशींच्या भजनसंध्येत धुळेकर चिंब अग्रवाल परिवारासह धुळेकरांनी धरला ठेका

**धुळे, दि.५- भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, उद्योग, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, सहकार आदी क्षेत्रांतील बहुआयामी व्यक्तिमत्त्व ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त रविवारी (ता. ४) सायंकाळी प्रसिद्ध गायक हंसराज रघुवंशी यांच्या सुमधुर आवाजातील भक्तिरसात अवघे धुळेकर चिंब झाले. येथील खान्देश गोशाळेच्या मैदानावर रात्री उत्तरोत्तर रंगत गेलेला या सोहळ्यात उपस्थित धुळेकरांसह अग्रवाल कुटुंबीयांनी धार्मिक भक्तिगीतांवर ताल धरला.**

आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या संकल्पनेतून झालेल्या या सोहळ्यात अग्रवाल कुटुंबाने दुष्काळी स्थितीचे समाजभान राखत शेतकऱ्यांप्रती आपली संवेदनशीलता दाखवून देत शेतकऱ्यांना वासरांसह दुभत्या गायींचे मान्यवरांच्या हस्ते दान



केले. तसेच शेतकरी दाम्पत्यांचा साडी-चोळीचा आहेर देत सन्मान केला. यानंतर प्रत्येकाला प्रतीक्षा असलेल्या हंसराज रघुवंशी यांच्या भजनसंध्येला प्रारंभ झाला.

**गीतांतून महादेवाला साकडे**

प्रसिद्ध गायक हंसराज रघुवंशी यांनी त्यांच्या सुमधुर आवाजात भगवान महादेव, श्रीराम, श्रीकृष्ण आदी देवतांच्या स्तुतीपर गीतांतून धुळे जिल्ह्यावर दुष्काळाचे ओढवलेले संकट दूर करण्याचे आवाहन केले. गायक हंसराज यांनी गायलेल्या गीतांमुळे संपूर्ण मैदानावरील धुळेकर त्यांना साथसंगत करताना प्रत्येक गीतावर टाळ्यांचा कडकडाट तर करतच होते. शिवाय प्रत्येक गीतावर नृत्याचा तालही धरत होते. या भक्तिमय वातावरणात अनेक मान्यवर आपले वय, हुद्दा विसरून देहभान हरपून नृत्यात दंग झाले होते.

**अग्रवाल कुटुंबियांचा ठेका**

गायक हंसराज यांनी केलेल्या आवाहनानुसार प्रारंभी आमदार अनुपभैया अग्रवाल, अल्पा अग्रवाल आणि चिरायू अग्रवाल यांनी व्यासपीठावर गायक हंसराज यांच्यासोबत गायनात साथसंगत केली. तसेच भक्तिपूर्ण गीतांवर नृत्यही केले. यानंतर व्यासपीठाखाली अनेक धुळेकरांसबोतच ओमप्रकाश अग्रवाल यांच्यासह अग्रवाल कुटुंबातील प्रत्येक सदस्याने गायक हंसराज यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत हात उंचावत नृत्याचा ताल धरला. सुमारे दोन तास चाललेल्या या भक्तिमय कार्यक्रमाने अवघे धुळेकर भारावून गेले. उपस्थितांकडून होणाऱ्या विनंतीसह मागणीनुसार गायक हंसराज रघुवंशी यांच्यासह साधो बँड पथकाने अनेक भक्तिगीते सादर करत धुळेकरांची मने जिंकली. याच कार्यक्रमात सत्कारमूर्ती (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,36,650 रु.+3% GST
सोने- 24 K -1,48,500 रु.+3% GST
चांदी- 2,26,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## प्रतापपूरला महिलेसह मुलाला जबर मारहाण

धुळे, दि.५- शेतीच्या वहिवाट रस्त्यावरून प्रतापपुर (ता. साक्री, ह.मु. साक्री) येथील ४० वर्षीय अंगणवाडी सेविकेसह तिच्या मुलाला ११ जणांनी शिवीगाळ दमदाटी करून मारहाण केली. महिलेचा विनयभंग केला, या प्रकरणी साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. संबंधित महिलेचे गाव शिवारात शेत आहे.

शेताच्या वहीवाट रस्त्यावरुन गावातील काहींनी शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास वाद घातला. शिवीगाळ, दमदाटी करून महिलेसह तिच्या मुलाला मारहाण केली, ठार मारण्याची धमकी दिली. (पान २ वर)




## अनिष्ट चालीरीती, अंधश्रद्धेचा बिमोड होण्याची गरज- मा.आ.डॉ.सुधीर तांबे

**साक्री, दि.५- समाजातील अनिष्ट चालीरीती, दैववाद व अंधश्रद्धेचा पूर्णपणे बिमोड होणे ही काळाची गरज असून दिन दुबळ्यांचे सक्षमीकरण फक्त शिक्षणातूनच होऊ शकते, आणि ते घडवून आणण्याची किमया शिक्षकच करू शकतो, असे गौरवोद्गार नाशिक विभाग पदवीधर मतदार संघाचे माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांनी व्यक्त केले.**

साक्री तालुका प्राथमिक शिक्षकांची सहकारी पतसंस्थाचे माजी चेअरमन, धुळे जिल्हा पदवीधर प्राथमिक शिक्षक संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष तथा सय्यदनगर ता.साक्री जि प शाळेचे शिक्षक विजय अभिमन खैरनार यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा प्रसंगी ते बोलत होते. साक्री येथील ठाकरे लॉन्स मध्ये कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साक्री पंचायत समितीचे माजी सभापती उत्तमराव देसले होते. प्रमुख अतिथी म्हणून धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक हर्षवर्धन दहिते, धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी बँकेचे माजी चेअरमन निशांत रंधे, उमाकांत बिरारीस, तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भानुदास गांगुर्डे, पंचायत समितीचे माजी सभापती (पान २ वर)

## शेतकरी संकटात हलगर्जीपणा नको बैठकीत अधिकाऱ्यांना सुचना-ना.रावल

**धुळे, दि. ५- पावसाचा सलग महिनाभराचा खंड, त्यामुळे संकटात आलेली खरीप पिके, पुढील काळातील पाणी व चाऱ्याची चिंता आणि त्यातच शेतातील विद्युत पंप, केबल व इतर साहित्य चोरीच्या तक्रारी या पार्श्वभूमीवर शेतकरी संकटात असताना कोणत्याही विभागाचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. प्रत्येक यंत्रणेने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने काम करून शेतकऱ्यांच्या अडचणींवर वेळेत तोडगा काढावा, असे सख्त निर्देश राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिले.**

शिंदखेडा विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री.रावल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. शिंदखेडा तालुक्यासोबतच मतदारसंघाचा भाग असलेल्या बळसाने आणि दुसाने महसूल मंडळांतील दुष्काळी परिस्थितीचाही त्यांनी स्वतंत्रपणे आढावा घेतला. महसूल, कृषी, महावितरण, जलसंपदा, पशुसंवर्धन, पाणीपुरवठा, रोजगार



हमी तसेच पोलीस प्रशासनाच्या कामकाजाची यावेळी विभागनिहाय माहिती घेण्यात आली. शिंदखेडा तालुक्यात सुमारे ३० दिवसांचा पावसाचा खंड पडल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. तालुक्यात ५०१.४० मिमी सरासरी अपेक्षित पावसाच्या तुलनेत ४०६.९० मिमी म्हणजे ८१.१५ टक्के पाऊस झाला आहे. खरीप हंगामातील पेरणी जवळपास ९९ टक्के झाली असली, तरी पावसाच्या दीर्घ खंडाचा उभ्या पिकांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची वाट न पाहता पुढील काही महिन्यांचे नियोजन प्रशासनाने आतापासूनच तयार ठेवावे, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. पंचनाम्यात विलंब नको; एकही पात्र शेतकरी वंचित राहता कामा नये दुष्काळामुळे बाधित पिकांचे पंचनामे तातडीने आणि अचूकपणे पूर्ण करण्यावर मंत्री श्री. रावल यांनी विशेष भर दिला. शेतकऱ्याला शासनाच्या मदतीपर्यंत पोहोचविण्यासाठी नुकसानीची अचूक नोंद अत्यंत महत्त्वाची असून, पंचनाम्यातील त्रुटी अथवा विलंबामुळे पात्र शेतकऱ्याला मदतीपासून वंचित राहावे लागू नये, (पान ४ वर)

## शिरपूरला पुन्हा बिबट्या ताब्यात

शिरपूर दि.५ (का.प्र.) : अर्थे व परिसरात मुक्त संचार करुन ग्रामस्थांच्या उरात धडकी भरवणाऱ्यांपैकी दुसरा बिबट्या पाच ऑक्टोबरला पहाटे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात अडकला. त्यामुळे आतापर्यंत वनविभागाने ताब्यात घेतलेल्या बिबट्यांची संख्या दोनवर पोहचली आहे. तथापि आणखी काही बिबट्यांचा परिसरात संचार असून ग्रामस्थांनी दक्षता घ्यावी असे आवाहन वनविभागाने केले आहे.

बोराडी वनक्षेत्रातील वासर्डी परिमंडळात अर्थे बु.शिवारात ९ सप्टेंबरला रात्री साडेसातला बिबट्याने दोन वर्षांच्या बालकाला जबड्यात धरून नेले होते. या घटनेनंतर बिबट्याला जेरबंद करण्याचे आदेश वरिष्ठांनी दिले. अर्थे बु., भरवाडे, टेंभे, टेकवाडे, खामखेडा, नवे लोंढरे, जुने लोंढरे, वरखळ, विखरण, नवे व जुने भामपूर, जळोद आदी परिसरात बिबट्याचा शोध सुरु होता. दोन ऑक्टोबरला पांडुरंग माळी यांच्या शेतात घराजवळ ट्रॅंक्विलायझर गनद्वारे बिबट्याला डार्ट करून बेशुद्ध करुन ताब्यात घेतले.

परिसरात बिबट्यांचा वावर असल्याची शक्यता गृहित धरुन वनविभागाने पिंजरे मात्र कायम ठेवले. त्यात बिबट्यासाठी आमिष म्हणून भक्ष्य ठेवण्यात आले. भरवाडे (ता.शिरपूर) शिवारातील पिंजऱ्यात दुसरा बिबट्या जेरबंद झाला. मुख्य वनसंरक्षक मोहन नाईकवाडी, (पान ४ वर)

पान १ वरुन

## एमपीएससीच्या अध्यक्षांसह सदस्यांची चौकशी

**विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची दखल**

एमपीएससीच्या विविध परीक्षांमध्ये कथित अनियमितता आणि नियोजनातील गोंधळावरून गेल्या काही दिवसांपासून राज्यातील स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे. पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून, अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. एमपीएससीच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा पेपर फुटल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने विद्यार्थ्यांचा संताप आणखी वाढला आहे. या प्रकरणात पेपरचा लाभ झाल्याचा आरोप असलेल्या विद्यार्थ्यांसह इतर आरोपींना अटक करण्यात आली आहे. याशिवाय राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा पॅटर्न बहुपर्यायी असावा की वर्णनात्मक, यावरूनही विद्यार्थ्यांमध्ये मतभेद आहेत. पुण्यात विविध मागण्यांसाठी स्वतंत्रपणे आंदोलने सुरू असल्याचे चित्र आहे.

**अध्यक्षांना हटवण्यापूर्वी चौकशी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी तसेच क्लासचालक यांच्यात झालेल्या बैठकीत एमपीएससीच्या अध्यक्षांना थेट हटवण्यापूर्वी नियमानुसार चौकशी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर आता अध्यक्ष, सदस्य आणि माजी पदाधिकाऱ्यांविरोधात चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याची शिफारस राज्यपालांकडे करण्यात आली आहे. या निर्णयामुळे एमपीएससीच्या कारभाराबाबत सुरू असलेल्या वादाला आता नवे वळण मिळाले आहे. राज्यपालांकडून समिती स्थापन करण्याबाबत काय निर्णय घेतला जातो आणि चौकशी समितीच्या अहवालात कोणते निष्कर्ष समोर येतात, याकडे विद्यार्थ्यांसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

**सचिव महेंद्र हरपाळकर कार्यमुक्त**

दरम्यान, एमपीएससी सचिव महेंद्र हरपाळकर यांना पदावरून कार्यमुक्त करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस आणि विद्यार्थ्यांच्या बैठकी दरम्यान त्यांच्या बदलीबाबत आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार हरपाळकर यांना सचिवपदावरून कार्यमुक्त करण्यात आले आहे. एमपीएससीच्या अध्यक्षपदी विवेक भीमनवार यांची डिसेंबर २०२५ मध्ये नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, त्यांनी प्रत्यक्ष अध्यक्षपदाचा कार्यभार मार्च २०२६ मध्ये स्वीकारला. आता त्यांच्या अध्यक्षपदावरून विद्यार्थ्यांमध्ये नाराजी असून, त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे.

**फडणवीस सरकारचे ७ मोठे निर्णय**

अध्यक्ष भीमनवार यांच्या चौकशीचा निर्णय, सचिव हरपाळकर यांची बदली, परीक्षा पारंपरिक पद्धतीने म्हणजेच ऑफलाइन घेतली जाणार, गट क मध्ये विक्रमी जागा वाढ, पुढील तीन वर्षांसाठी मेगा भरती आराखडा, विद्यार्थ्यांसाठी सिंगल कार्ड प्रणाली अवलंबली जाणार असल्याने प्रत्येक वेळी कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता भासणार नाही, तसेच ७० हजारांहून अधिक रखडलेल्या पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन देत विविध निर्णयांची घोषणा केल्यानंतर विद्यार्थी शिष्टमंडळाने आपले नियोजित बेमुदत आंदोलन तूर्त स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एमपीएससीच्या परीक्षा, पदभरती आणि आयोगाच्या कारभारासंदर्भातील वादावर सरकारने घेतलेल्या निर्णयांकडे आता विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

## फॉर्म सहा बदलास मान्यता नाहीच- सर्वोच्च न्यायालय

करताना सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी या दाव्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. याबाबत आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावली आहे.

सुधारित फॉर्मला न्यायालयाने कोणतीही मंजुरी दिलेली नाही, असे स्पष्ट करताना न्यायालयाने संबंधित फॉर्ममध्ये बदल नेमका कोणी केला, याची माहिती रेकॉर्डच्या माध्यमातून तपासण्यात येईल, असे संकेत दिले. नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या फॉर्म सहा मध्ये करण्यात आलेल्या बदलांवरून हा वाद निर्माण झाला आहे. सुधारित फॉर्म मधील घोषणापत्रानुसार, नवीन मतदार म्हणून नोंदणी करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला स्वतःचे किंवा पालकांचे नाव यापूर्वीच्या एसआयआर प्रक्रियेदरम्यान मतदार यादीत नोंदले गेले होते की नाही, याबाबत माहिती द्यावी लागणार आहे. मात्र, यापूर्वी इतर राज्यांमध्ये वापरण्यात आलेल्या फॉर्म सहा मध्ये अशी अट नव्हती. त्यामुळे या नव्या अटीचा समावेश कोणत्या अधिकाराअंतर्गत करण्यात आला, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**निवडणूक आयुक्तांचाही आक्षेप**

फॉर्म सहा मध्ये करण्यात आलेल्या बदलांवर निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनीही आक्षेप घेतल्याचे सांगण्यात आले आहे. मतदार नोंदणी नियम १९६० मध्ये आवश्यक सुधारणा केल्याशिवाय अशा प्रकारे फॉर्म मध्ये बदल करता येणार नाही, असा त्यांचा आक्षेप असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या आक्षेपांनंतरही सुधारित फॉर्म लागू करण्यात आल्याने वाद आणखी वाढला. त्यानंतर निवडणूक आयोगाने २६ सप्टेंबर रोजी प्रसिद्धीपत्रक जारी करून बिहारमधील एसआयआर संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या यापूर्वीच्या निकालाचा हवाला दिला. मात्र, बिहार एसआयआर प्रकरणातील त्या निकालामध्ये नव्या घोषणापत्राची तपासणी झालेली नव्हती. कारण संबंधित बदल हा न्यायालयाच्या निकालानंतर करण्यात आला होता. त्यामुळे या बदलाला सुप्रीम कोर्टाची मान्यता असल्याचा दावा कितपत योग्य आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ॲडव्होकेट शैलेंद्र मणी त्रिपाठी यांनी दाखल केलेल्या याचिकेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त मनीष गर्ग आणि महासंचालक सीमा खन्ना यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**निवडणूक आयोगास नोटीस**

सर्वोच्च न्यायालयाने आज निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. हा अत्यंत गंभीर विषय आहे. एसआयआर प्रक्रियेबाबत निर्णय एकतर्फी घेतले गेले का? निवडणूक आयोगाच्या सर्व सदस्यांची संमती होती का? निर्णय बहुमताने झाले की केवळ मुख्य निवडणूक आयुक्तांच्या पातळीवर झाले? याची संपूर्ण माहिती सर्वोच्च न्यायालयाने मागवली आहे. माझा सरळ सवाल आहे, या देशातील नागरिकांच्या मताधिकारावर निर्णय घेण्याचा अधिकार कुणी दिला? असा सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी विचारला आहे. अठरा वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकाला मतदार म्हणून आपला अधिकार बजावता आला पाहिजे. एखाद्या नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जात असेल, तर त्यामागची प्रक्रिया पारदर्शक आणि कायदेशीर असलीच पाहिजे, असेही वडेट्टीवार म्हणाले. त्याअनुषंगाने सर्वोच्च न्यायालयास नोटीस बजावली आहे.

## आदि. शेतकऱ्यांचे वनदावे तातडीने निकाली काढा

आणून दिले. प्रलंबित वनदावे धारक तीन पिढ्यांपासून संबंधित जमिनी कसत आहेत. मात्र, त्यांचे वनदावे मंजूर न झाल्याने त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. शेती कसूनही त्यांना शेतकऱ्याचा अधिकृत दर्जा मिळत नसल्याची गंभीर बाबही निवेदनातून मांडण्यात आली आहे.

यासाठी दि. १० सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून शिरपूर तालुक्यातील प्रलंबित वनदाव्यांबाबत कार्यवाही करावी. तसेच संबंधित प्रलंबित वनदाव्यांच्या संदर्भात शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त यांना आवश्यक आदेश द्यावेत, अशी मागणी आमदार अमरिशभाई पटेल व आमदार काशिराम पावरा यांनी केली आहे. याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्वरित दखल घेऊन विभागीय आयुक्त श्री गेडाम यांना त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

## सालटेकजवळ दुचाकी अपघात; एक जण ठार

यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. यासंदर्भात नातेवाईक तुषार साहेबराव पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दुसऱ्या दुचाकी स्वाराविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल झाला. पोलीस उपनिरीक्षक भूषण शेवाळे तपास करीत आहेत.

पान १ वरुन

## ओमप्रकाश अग्रवाल म्हणजे अनेक क्षेत्रांतील

सत्कारमूर्ती अग्रवाल, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, खासदार स्मिता वाघ, खासदार डॉ. शोभा बच्छाव, आमदार सर्वश्री अमरिशभाई पटेल, मंगेश चव्हाण, नंदकिशोर महाजन, काशिराम पावरा, माधवी नाईक, रोहिणी नायडू, मंजुळा गावित, राहुल ढिकले, राम भदाणे, अमोल जावळे, राजेश पाडवी, लक्ष्मण सावजी, महापौर मायादेवी परदेशी, माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी आमदार कुणाल पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे, भाजपचे धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी प्रमुख पाहुणे होते.

**सरकार अनुपभैयांच्या पाठीशी : बावनकुळे**

श्री. बावनकुळे म्हणाले, की सर्वप्रथम धुळे शहरवासीयांपुढे नतमस्तक होतो, की तुम्ही सर्वांनी अनुपभैया अग्रवाल यांच्या रूपाने हिरा कार्यकर्त्याला विधानसभेत पाठविले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये उत्कृष्ट काम करणारे आमचे जे दहा आमदार आहेत त्यातील एक अनुपभैया आहेत. धुळे शहराचे जेही प्रश्न, समस्या आहेत ते सोडविण्यासाठी ते सतत पाठपुरावा करत असतात. आम्हीही त्यांना सहकार्य करत आहोत. आजही ओपीजींनी विधानसभा निवडणुकीत अनुपभैयांनी शहरवासीयांना जी-जी वचने दिली ती पूर्ण करण्यासाठी सरकारने त्यांच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले. मी धुळेकरांसमोर जाहीर करतो, की अनुपभैयांनी शहर विकासासाठी मागितलेले प्रत्येक काम राज्य सरकार पूर्ण करेल.

**रावेर एमआयडीसीची जागा मंजूर : अनुपभैया**

आमदार अग्रवाल म्हणाले, की आज ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत महसूलमंत्री बावनकुळे यांनी आज मोठी भेट दिली आहे. आपल्या सर्वांचे ४० वर्षांपासूनचे एमआयडीसी विस्तारीकरणाचे जे स्वप्न होते ते आज पूर्ण झाले आहे. त्यांनी आज रावेर एमआयडीसीसाठी २००० एकर जागा मंजूर केली आहे. यामुळे शहराच्या औद्योगीकरणाला मोठी चालना मिळणार असून, या एमआयडीसीत स्थानिक कुशल-अकुशल मनुष्यबळाला रोजगाराच्या मोठ्या संधी प्राप्त होणार आहेत. या निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळाचे शतशः आभार मानतो.

**आमदार अनुपभैया आम्हा सर्वांचे लाडके आमदार**

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, की अनुपभैया आम्हा सर्वांचे लाडके आमदार आहेत. त्यांनी शहराच्या विकासासाठी सांगितलेल्या प्रत्येक कामासाठी निधी देण्याचा प्रयतक करत आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आज आपल्या अमृतमहोत्सवानिमित्त शुभेच्छा पाठविल्या आहेत. त्यांनी सांगितले, की आमदार अनुपभैयाच्या नेतृत्वात धुळे शहर प्रचंड शक्तिशाली बनवू. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज धुळे शहराच्या विकासासाठी ४० कोटी रुपयांचा निधी जाहीर केला आहे. यासाठी आमदार अनुपभैया आणि महापौर मायादेवी परदेशी यांच्याकडून सतत पाठपुरावा सुरू होता. तो आज यशस्वी ठरला आहे.

पान १ वरुन

## बसमधून पावणे सहा लाखांचा खवा जप्त

थांबवली. पथकाने बसची तपासणी केली असता त्यात विविध कंपन्यांचा मावा आढळला. पुढील कारवाईसाठी ट्रॅव्हल्स अवधान शिवारात टोल नाक्याजवळील दिसान कोल्ड स्टोरेज येथे नेण्यात आले. तपासणीत वाहनात खालील विविध ब्रँड्सचा मावा व हलवा आढळून आला. भेसळीच्या संशयावरून एकूण अकरा अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी ताब्यात घेतले. १ हजार ८५४ किलो मावा असून त्याची किंमत ५ लाख ८० हजार पाचशे रुपये आहे. माव्याचा साठा कोल्ड स्टोरेजमध्ये सुरक्षित सील करण्यात आला आहे. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सहाय्यक आयुक्त (अन्न) गो. वी. माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी आनंद पवार, शशिकांत राणे, अरविंद राऊत, मंगेश भावसार यांच्या पथकाने कारवाई केली.

## धनगर समाजाची फसवणुक करणाऱ्या केंद्र व

काहीही मिळालेले नाही. महाराष्ट्रात दोन नंबरची मतदार संख्या असलेला हा समाज कायम राजकारण्यांच्या खोट्या आश्वासनाला बळी पडलेला आहे.वर्तमान राज्य शासनाच्या प्रमुखांनी तर तुम्ही आम्हाला मदत करा आम्ही तुम्हाला पहिल्याच कॅबिनेट बैठकीत अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा परिपूर्ण प्रस्ताव/ शिफारस केंद्र शासनाकडे पाठवू असे जाहीर सभेत आश्वासन दिले होते. या शासनाला आता बारा वर्षांचा कालावधी उलटला तरी ते हे आश्वासन पाळण्यात ते टाळाटाळ करत आहेत.

मराठवाड्यातील जालन्यातून ठिणगीच्या रूपात सुरू केलेले हे निर्णायक आंदोलन आता वनव्याच्या रूपात महाराष्ट्रभर पोहोचवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात मोर्चे व मिळावे आयोजित करून शासनाच्या नाकर्तेपणाची जाण समाजाला करून देण्यासाठी आपण राज्यभर दौरा करत असल्याचे त्यांनी सांगितले.येत्या १५ ऑक्टोबरच्या धुळे येथील मेळावा व मोर्चात जास्तीत जास्त समाज बांधवांनी महिला, तरुण मुलांसह सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी व्यासपीठावर उद्योजक लखन रुपनर, प्रभारी सरपंच लखन ठेलारी,माजी सरपंच दंगल दंगल,समाजाचे उपाध्यक्ष मोहन धनगर, जेष्ठ कार्यकर्ते शांतीलाल धनगर,नंदू धनगर,भटू धनगर आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद धनगर यांनी केले.

## सुशिनाल्याच्या पुनर्वनासाठी मान्यता द्या

तयार करून शासनाकडे सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.महसूलमंत्र्यांनी प्रत्यक्ष भेटीदरम्यानच दिलेल्या या निर्देशांमुळे सुशी नाला परिसरातील बाधित कुटुंबांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नाला सकारात्मक दिशा मिळाली असून, शासन मान्यतेची प्रक्रिया पुढे जाण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. बेघर कुटुंबांना हक्काचा निवारा आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, यासाठी खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी केलेला हा प्रभावी पाठपुरावा बाधित कुटुंबांसाठी अत्यंत दिलासादायक ठरणार आहे.

## हंसराज रघुवंशींच्या भजनसंध्येत धुळेकर चिंब

**ओपी शेट यांचा हृद्य सत्कार**

ओमप्रकाश अग्रवाल यांना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल यांच्यासह व्यासपीठावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांची आकर्षक मूर्ती भेट देत त्यांचा गौरव करण्यात आला.

पान १ वरुन

## शेतकरी संकटात हलगर्जीपणा नको

असेत्यांनी स्पष्ट केले. दि. ४ ऑक्टोबरअखेर ३५ गावांतील २२ हजार ८७० खातेदारांच्या २४ हजार ३१५ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण करण्यात आल्याची माहिती बैठकीत सादर करण्यात आली. उर्वरित कार्यवाहीही वेगाने पूर्ण करून शासनस्तरावर आवश्यक प्रस्ताव वेळेत पाठविण्याचे निर्देश त्यांनी दिले. वीजपंप-केबल चोरीवर कडक भूमिका; शेतकऱ्याला दुहेरी संकटात ढकलू नका शेतातील विद्युत पंप, केबल आणि अन्य साहित्य चोरीच्या तक्रारींचा विषय बैठकीत पुढे येताच पालकमंत्री श्री. रावल यांनी महावितरण आणि पोलीस प्रशासनाला सख्त निर्देश दिले. दुष्काळाच्या काळात शेतकरी आधीच संकटात असताना चोरीमुळे त्याचे सिंचन बंद पडणे किंवा वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे उपलब्ध पाण्याचाही वापर करता न येणे गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले. चोरीच्या घटनांची तातडीने दखल घेऊन कठोर कारवाई करावी, संवेदनशील भागात गस्त वाढवावी, तसेच

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त गिरीश पाटील, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता जयश्री साळवे, वरिष्ठ भूवैज्ञानिक गिरीष भोरे, महावितरणचे कार्यकारी अभियंता भाऊसाहेब पाटील, शिरपूर उपविभागाचे प्रांताधिकारी शरद मंडलिक, शिंदखेड्याचे तहसीलदार नितीनकुमार देवरे, साक्रीचे तहसीलदार साहेबराव सोनवणे, अभिजीत अहिरे, साक्री पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सोनवणे, शिंदखेडा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रुती कारंडे, साक्रीचे मुख्याधिकारी तुषार सोनवणे, दोंडाईचाचे मुख्याधिकारी देवेंद्रसिंग परदेशी, साक्रीच्या गटशिक्षणाधिकारी कविता मेखे, शिंदखेड्याचे गटशिक्षणाधिकारी किरण शिंदे, तालुका कृषी अधिकारी सुधीर ईशी, साक्रीचे तालुका कृषी अधिकारी सोनवणे, सहाय्यक निबंधक शिरगावे, नरडाणा येथील उपकार्यकारी अभियंता जाधव, दोंडाईचाचे उपकार्यकारी अभियंता मोटझरे, शिंदखेड्याचे उपकार्यकारी अभियंता अहिरे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपविभागीय अधिकारी पवार, पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त साळुंखे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता सावंत, तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भूषण वाकडे, नरडाणा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आव्हाणे, शिंदखेडा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक ढाकणे, शिंदखेडा नगरपंचायतीचे साळुंखे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## शिरपूरला पुन्हा बिबट्या ताब्यात

उपवनसंरक्षक राजेंद्र सदगीर, विभागीय वन अधिकारी राहुल घरटे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी किरण गिरवले, विशाल दुराने, सुनील जोग, भूषण वाघ, योगेश वारुळे यांच्यासह शिरपूर उपवनविभागातील वनपाल, वनरक्षक, वनमजूर व वाहनचालकांनी कारवाईत सहभाग घेतला.


पाहिजेत
TASTY TOWN – FOOD & FESTIVE HUB
फूड कोर्ट (खाऊ गल्ली) साठी सुवर्णसंधी!
स्थान: प्रकाश टाकी जवळ, पारोळा रोड, धुळे
खाऊ गल्लीतील खाद्यपदार्थांची दुकाने भाडे तत्त्वावर उपलब्ध आहेत. तसेच, मार्केटिंगसाठी मुलं व मुली पाहिजेत
✻ आकर्षक पगार
✻ इन्सेन्टिव्हची सुविधा
✻ फ्रेशर्सना प्राधान्य
✻ चांगल्या संवाद कौशल्याला प्राधान्य
इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क:- विजय जैन
98231 63447
75887 35148

पाहिजे
कापड दुकानात सोफा कारागीर इतर सेल्समन काम करणारे जेन्टस/ लेडिज लावणे आहे.
राकेश कापड दुकान
9423941247


३५ वा स्मृतिदिन
कै. जगन्नाथ अप्पासाहेब देशमुख
रविवार-६ ऑक्टोंबर १९९१ (कृष्ण १४, भाद्रपद)
ति. भाऊ, आपण दिलेला पंचमहाभुताचा अनंतात विलीन होण्याची सेवा आजही आपली सेवा देशमुखअप्पा परीवार देवपूर स्मशानभूमीत देत आहे. धुळेकर नागरीकांच्या सेवेत!
✻ आपले ✻
श्रीमती संध्या प्रकाश देशमुख
विजयेंद्र प्रकाश देशमुख — सौ. प्रियंका विजयेंद्र देशमुख
ॲड. बिना प्रकाश देशमुख — सौ. शुभांगी किरण देशमुख
चि. विश्वजीत विजयेंद्र देशमुख — सौ. निता किरण देशमुख
नातवंडे- बिपीनदादा, बुलबुल, मनवा, दादा, डेमी, कृष्णा, निशु परी.
समस्त देशमुख अप्पा परिवार
देवपूर अमरधाम धुळे

Tally Opraotor पाहिजेत
धुळे येथील Jay Balaji Enterprises येथे Tally Oprator पदासाठी अनुभवी Employee आवश्यक आहे.
शैक्षणिक पात्रता: Tally Prime चे ज्ञान आवश्यक.
अनुभव : संबंधीत कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
कामाची वेळ : सकाळी ९.३० ते ६.३०
पद : Tally Oprator
नोकरीचे ठिकाण : नगावबारी देवपूर, धुळे
इच्छुकांनी संपर्क साधावा.
-: संपर्क :-
निखिल मराठे, 9637785666

सागवान व साल लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, PVC फायबर दरवाजे, RCC सिमेंटचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण...

शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

अकौंटंट पाहिजे
लेडीज/जेन्टस
-: संपर्क :-
भाग्यश्री कृषी सेवा केंद्र
पारोळा रोड, प्रकाश टॉकीजसमोर, धुळे
9423135555

पाहिजे
दुकान कामासाठी मुलगा पाहिजे.
अनिल ट्रेडर्स
डॉ. सुभाष भामरे राम हॉस्पिटल समोर, ८० फुटी रोड धुळे.
9422285182
8788832710

।।श्री।।
महासेल । महासेल । महासेल ।
मेन्स वेअर रेडीमेड शेरवानी- कुर्ता पैजामा व सुटस् (ब्लेझर)
"भव्य महासेल" भरपुर डिस्काऊंट
फक्त ३ दिवस
(०६/१०/२६ ते ०८/१०/२६)
जुगल वस्त्रालय, खोलगल्ली, धुळे.

प्लॉट विकणे
3900 sq.ft. 15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331

पाहिजेत
दुकान कामासाठी मेहनती जेन्टस व लेडीज लावणे आहेत.
हेल्पर : २ जागा
सेल्समन : २ जागा
शाह हॅन्डलुम
१४६४, गल्ली नं. २, नवग्रही
पारोळा रोड, धुळे
9422792384

गाळे विकणे
टावर गार्डन जवळ दुसरा मजला फर्निचर व A/C सह गाळे विकणे आहे.
-: संपर्क :-
9422288002

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej
LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
JAPAN PREMIUM

0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV
HDB FINANCIAL SERVICES
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

पाहिजेत
नवी क्रेटा गाडीसाठी कायमस्वरूपी व अनुभवी चालकाची आवश्यकता आहे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
9822408140

पाहिजेत
एके मीडिया धुळे या अग्रगण्य जाहिरात एजन्सीला खालील पदांसाठी उत्साही व मेहनती उमेदवारांची आवश्यकता आहे.
» वसुली प्रतिनिधी - 1
पदवीधर व मोटार सायकल आवश्यक
» डीटीपी ऑपरेटर - 2
कोरल-फोटोशॉप, मराठी टायपिंग आवश्यक
अर्जासह भेटा: स. ११ ते संध्या. ७ पर्यंत
एके मीडिया
पहिला मजला, सत्यम आर्केड, पतंजली स्टोअर्स समोर, नगरपट्टी, धुळे.
9881136034

पाहिजेत
अनुभवी सेल्समन पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
गल्ली नं. २, अकबर चौक, धुळे
9422286958

पाहिजे
होलसेलमध्ये दुकानासाठी
१) बाहेर गावासाठी
सेल्समन : २ जागा
BSC D Pharma असल्यास प्राधान्य
-: समक्ष भेटा :-
श्री साई फार्मा
गल्ली नं.५, धुळे
9270144871

घर भाड्याने पाहिजे
३ किंवा ४ रुमचे घर भाड्याने पाहिजे.
दत्त मंदिर चौक परिसरात
-: संपर्क :-
8390332124

पाहिजे
केटर्स कामासाठी अनुभव असलेला मॅनेजर पाहिजे.
-: संपर्क :-
9823382447


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०